लोकमत

# सामाजिक असमानता दूर करण्यासाठी कृतिशील अंमलबजावणी हवी

## आर. इंदिरा : शिवाजी विद्यापीठात संगवे स्मृती व्याख्यान

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : जागतिकीकरणाने सुविधा जरुर आणल्या. मात्र, त्या उपभोगण्याची ताकद वंचितांमध्ये निर्माण करता आली नाही; कारण ही ताकद मूठभर लोकांपुरतीच मर्यादित झाली. हे बदलायचे असेल तर काही व्यवहार्य पर्याय द्यावे लागतील. त्यांची कृतिशील अंमलबजावणी करावी लागेल; तरच गरिबी, सामाजिक असमानता दूर होईल, असे मत इंडियन सोशिऑलॉजिकल सोसायटीच्या अध्यक्षा प्रा. डॉ. आर. इंदिरा यांनी येथे व्यक्त केले.

समाजशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित प्रा. डॉ. विलास संगवे स्मृती व्याख्यानमालेत त्या प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ समाजशास्त्रज्ञ प्रा. डॉ. उत्तमराव भोईटे होते. प्रा. इंदिरा यांच्या व्याख्यानाचा विषय 'भारतातील गरिबी, सामाजिक असमानता आणि अन्याय' असा होता. प्रा. इंदिरा म्हणाल्या, जागतिकीकरणाच्या घुसळणीत होणारी फरफट, तंत्रज्ञानामुळे आलेल्या भौतिक सुविधांमागे धावण्याची प्रवृत्ती आणि यासाठी राबविण्यात येणारी धोरणे यांमुळे सत्ता व संपत्तीचे केंद्रीकरण होत गेले.



शिवाजी विद्यापीठात गुरुवारी प्रा. डॉ. विलास संगवे स्मृती व्याख्यानमालेत प्रा. डॉ. आर. इंदिरा यांनी विचार मांडले.

माजी विभागप्रमुख प्रा. डॉ. एस. एन. पवार, आर. बी. पाटील, विभागप्रमुख प्रा. डॉ. जगन कराडे प्रमुख उपस्थित होते. प्रा. प्रल्हाद माने यांनी परिचय करुन दिला. प्रतिभा पवार यांनी आभार मानले.

पुढारी



कोल्हापूर : प्रा. डॉ. विलास संगवे स्मृती व्याख्यानमालेत बोलताना प्रा. डॉ. आर. इंदिरा. व्यासपीठावर प्रा. डॉ. एस. एन. पवार, प्रा. डॉ. आर. बी. पाटील, प्रा. डॉ. जगन कराडे, प्रा. डॉ. उत्तमराव भोईटे, प्रा. डॉ. प्रतिभा पवार आदी.

# जागतिकीकरणाने मानवी चेहरा हरवला : डॉ. इंदिरा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

जागतिकीकरणामुळे समाजाचा मानवी चेहरा हरवला आहे. या प्रक्रियेत श्रीमंत अधिकाधिक श्रीमंत तर गरीब खोल गर्तेत ढकलला जात आहे. मानवी समाजाच्या दृष्टीने ही बाब धोकादायक आहे, असे मत इंडियन सोशालॉजिकल सोसायटीच्या अध्यक्षा प्रा. डॉ. आर. इंदिरा यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठ समाजशास्त्र विभागातर्फे प्रा. डॉ. विलास संगवे स्मृती व्याख्यानमालेत त्या प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या. 'भारतातील गरिबी, सामाजिक असमानता आणि अन्याय,'असा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ समाजशास्त्रज्ञ प्रा. डॉ. उत्तमराव भोईटे होते. माजी विभागप्रमुख प्रा. डॉ. एस. एन. पवार, प्रा. डॉ. आर. बी. पाटील उपस्थित होते.

विभागप्रमुख प्रा. डॉ. जगन कराडे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. प्रल्हाद माने यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रा. डॉ. प्रतिभा पवार यांनी आभार मानले.

# जागतिकीकरणाने मानवी चेहरा हरवला

## – डॉ. आर. इंदिरा

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

जागतिकीकरणामुळे समाजाचा मानवी चेहराच हरवला आहे. या प्रक्रियेत श्रीमंत अधिकाधिक श्रीमंत, तर गरीब खोल गर्तेत ढकलला जात आहे. मानवी समाजाच्या दृष्टीने ही बाब अत्यंत धोकादायक आहे, असे मत इंडियन सोशालॉजिकल सोसायटीच्या अध्यक्षा प्रा. डॉ. आर. इंदिरा यांनी व्यक्त केले.

समाजशास्त्र विभागाच्या वतीने प्रा. डॉ. विलास संगवे स्मृती व्याख्यानमालेत 'भारतातील गरिबी, सामाजिक असमानता आणि अन्याय' या विषयावर बोलत होत्या.



**कोल्हापूर : व्याख्यानमालेत बोलताना डॉ. आर. इंदिरा. सोबत अन्य मान्यवर.**

अध्यक्षस्थानी ज्येष्ठ समाजशास्त्रज्ञ प्रा. डॉ. उत्तमराव भोईटे होते. माजी विभागप्रमुख प्रा. डॉ. एस. एन. पवार, प्रा. डॉ. आर. बी. पाटील, विभागप्रमुख प्रा. डॉ. जगन कराडे प्रमुख उपस्थित होते.

डॉ. इंदिरा म्हणाल्या, जागतिकीकरणाच्या घुसळणीत होणारी फरफट, तंत्रज्ञानामुळे आलेल्या भौतिक सुविधांमागे धावण्याची प्रवृत्ती आणि यासाठी राबवण्यात येणारी धोरणे यांमुळे सत्ता आणि संपत्तीचे केंद्रीकरण होत गेले. जागतिकीकरणाने सुविधा जरूर आणल्या. मात्र, त्या सुविधा उपभोगण्याची ताकद वंचितांमध्ये निर्माण करता आली नाही. कारण ही ताकद केवळ मूठभर लोकांपुरतीच मर्यादित झाली. हे चित्र बदलायचे असेल, तर काही व्यवहार्य पर्याय द्यावे लागतील. त्याची कृतिशील अंमलबजावणी करावी लागेल. तरच गरिबी, सामाजिक असमानता दूर होईल.

विभागप्रमुख प्रा. डॉ. जगन कराडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. प्रल्हाद माने यांनी परिचय करून दिला. प्रा. डॉ. प्रतिभा पवार यांनी आभार मानले.

# जागतिकीकरणात माणूस हरवला

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

'जागतिकीकरणामुळे समाजाचा मानवी चेहराच हरवला आहे. या प्रक्रियेत श्रीमंत अधिकाधिक श्रीमंत, तर गरीब खोल गर्तेत ढकलला जात आहे. समाजाच्यादृष्टीने ही बाब अत्यंत धोकादायक आहे,' असे मत इंडियन सोशालॉजिकल सोसायटीच्या अध्यक्षा प्रा. डॉ. आर. इंदिरा यांनी गुरुवारी येथे व्यक्त केले.

समाजशास्त्र विभागाच्यावतीने 'प्रा. डॉ. विलास संगवे स्मृती' व्याख्यानमालेत त्या प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या. 'भारतातील गरिबी, सामाजिक असमानता आणि अन्याय' असा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता.

अध्यक्षस्थानी ज्येष्ठ समाजशास्त्रज्ञ प्रा. डॉ. उत्तमराव भोईटे होते. माजी विभागप्रमुख प्रा. डॉ. एस. एन. पवार, प्रा. डॉ. आर. बी. पाटील, विभागप्रमुख प्रा. डॉ. जगन कराडे प्रमुख उपस्थित होते.

असमानता, गरिबी आणि पर्यायाने



अन्याय या बाबी परस्परांशी निगडीत असल्याचे स्पष्ट करून डॉ. इंदिरा यांनी राज्यघटनेने वंचित समूहाला संधीची समानता बहाल केलेली असतानाही हे घटक अंमलबजावणीतील त्रुटींमुळे न्यायापासून वंचित राहिले, असे स्पष्ट केले.

त्या म्हणाल्या, 'जागतिकीकरणाच्या घुसळणीत होणारी फरपट, तंत्रज्ञानामुळे आलेल्या भौतिक सुविधांमागे

**प्रा. डॉ. आर. इंदिरा यांचे मत**

धावण्याची प्रवृत्ती आणि यासाठी राबवण्यात येणारी धोरणे यांमुळे सत्ता आणि संपत्तीचे केंद्रीकरण होत गेले. जागतिकीकरणाने सुविधा जरूर आणल्या. मात्र त्या सुविधा उपभोगण्याची ताकद वंचितांमध्ये निर्माण करता आली नाही. कारण ती केवळ मूठभर लोकांपुरतीच मर्यादित झाली. हे चित्र बदलायचे असेल तर काही व्यवहार्य पर्याय द्यावे लागतील. त्याची कृतिशील अंमलबजावणी करावी लागेल. तरच गरिबी, सामाजिक असमानता दूर होईल.'

**आरक्षणासाठीचा संघर्ष धोकादायक**

'राज्यघटनेने मागास आणि वंचितांच्या उत्थानासाठी संधीची समानता म्हणून राखीव जागांचे धोरण स्वीकारले आहे,' असे स्पष्ट करून प्रा. डॉ. उत्तमराव भोईटे म्हणाले, 'आज अनेक जाती स्वतःला मागास समजत आहेत. त्याही राखीव जागांची मागणी करीत आहेत. त्यासाठी संघर्ष करण्यासही तयार आहेत. हा संघर्ष समाजव्यवस्थेसाठी भविष्यात धोकादायक ठरणार आहे.'

विभागप्रमुख प्रा. डॉ. जगन कराडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. प्रल्हाद माने यांनी परिचय करून दिला. प्रा. डॉ. प्रतिभा पवार यांनी आभार मानले.